सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र : ६२२/२०२३/नाशिक

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री. वसंतराव जेसा चव्हाण,<br>रा. नितीन नगर, शहादा, ता. शहादा, जि. नंदूरबार-४२५४०९. | सहाय्यक कुलसचिव, यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक, ता.जि.नाशिक-४२२२२२. |

**<u>सुनावणी दिनांक १७/०९/२०२५</u>**

तक्रारदार यांचा निरंक दिनांकाचा तक्रार अर्ज राज्य माहिती आयोगाकडे दि. १३/११/२०२३ रोजी प्राप्त झाला आहे. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १२/०८/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. तर तक्रारदार व तत्कालीन जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित होते.

२) तक्रारदार यांच्या आयोगाकडे दिनांक १३/११/२०२३ रोजी प्राप्त झालेल्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, " आयोगाने द्वितीय अपिल क्र. ५५७/२०१६/नाशिक संदर्भात दि. १९/०१/२०१८ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीवेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी आहे."

३) तक्रारदार यांनी दि.२४/११/२०१५ रोजीच्या मूळ माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली होती. "श्रीमती प्रतिभा प्रल्हाद पवार, रा. विसावाडी, देवपूर, धुळे यांनी विद्यापीठात बी. ए. शिक्षण २०००-२००४ मध्ये प्रवेश घेतांना उप शिक्षिकेच्या नेमणूकीचे खोटे व बनावट कागदपत्रके दाखल करुन प्रवेश घेतांना उप शिक्षिकेच्या नेमणूकीचे खोटे व बनावट कागदपत्रके दाखल करुन प्रवेश घेतला व विद्यापीठाची दिशाभूल करुन फसवणूक केली, या कामी मदत करणाऱ्यांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी नोंदणीकृत पोस्टाने विद्यापीठाच्या विद्यार्थी सेवा विभागाकडे दि. ०५/०८/२०१५ रोजी पाठविलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती."

४) आयोगाने द्वितीय अपिल क्र. ५५७/२०१६/नाशिक संदर्भात दि. १९/०१/२०१८ झालेल्या सुनावणीअंती पुढीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत.

*"विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दि. २४/११/२०१५ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावे."*

५) सुनावणीवेळी उपस्थित विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी प्रस्तूत प्रकरणी दि. १०/१०/२०२५ अन्वये अहवाल सादर केला असून त्यात "आयोगाने द्वितीय अपिल क्र. ५५७/२०१६/नाशिक संदर्भात दि. १९/०१/२०१८ अन्वये पारीत केलेले आदेश दि. २७/०४/२०१८ रोजी प्राप्त झाले असून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पत्र क्र. २०१८/३५/माअक दि. ०२/०५/२०१८ अन्वये तक्रारदार यांना माहिती पुरविलेली आहे." असे नमूद केले आहे.

६) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, आयोगाने द्वितीय अपिल क्र. ५५७/२०१६/नाशिक संदर्भात दि. १९/०१/२०१८ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना दि. ०२/०५/२०१८ अन्वये माहिती पुरविल्याचे दिसून येते. आयोगाच्या आदेशानूसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केलेली असल्याचे दिसून येते मात्र तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात द्वितीय अपिल सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती खोटी, चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे नमूद केले आहे. मात्र प्रत्यक्ष सुनावणीवेळी तक्रारदार अनुपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने काहीही सिध्द केले नसल्याने सदर तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तूत तक्रार क्र. ६२२/२०२४/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

जावक क्र ९८८४ 12 MAR 2026